## अतुल मनोहर धनवडे

वारणानगरमध्ये एक असा समज होता की श्री वारणा विद्यालयात दहावी पास होऊन पोरं एकदा बाहेर पडली की ती गोठ्यातून सुटलेल्या जनावरांसारखी मोकाट उधळतात. काही जण या पोरांची तुलना पिंजऱ्यातून सुटलेल्या वन्य श्वापदांशी करत. हे काही अंशी खरेही होते. प्राचार्य महाबळेश्वरवालांच्या अंकुशाखाली कित्येक वर्षे दबून राहिल्यानंतर अकरावीत कॉलेजमध्ये गेल्यावर अचानक निळे आकाश, मोकळे रान मिळे आणि कर्फ्यू उठल्यासारखे सर्व जाचक नियम अचानक रद्द होत. ना वेळेचं बंधन, ना युनिफॉर्मचं. नखे वाढवा किंवा झुलपे ठेवा. लिपस्टिक लावा नाहीतर अंगभर मेंदी. आक्षेप घ्यायला कुणीच नाही! असे झाल्यावर पोरे मोकाट सुटणे हे साहजिक होते.

मी दहावीत गेल्यावर वर्गात अनेक नवीन चेहरे दिसू लागले. शाळेचे शेवटचे वर्ष असल्याने दहावीला फारच महत्त्व होते. आयुष्याची पुढची दिशा ठरवणारे, अत्यंत crucial वर्ष असले उद्गार आमच्या कानी पडत. श्री वारणा विद्यालयाची “चांगली शाळा” अशी ख्याती असल्याने पंचक्रोशीतील इतर शाळांतून मुले आमच्या शाळेत ट्रान्स्फर घेत. कोडोली विद्यालयातून अविनाश जोशी आणि अभय धनवडे हे दोघे अशाच प्रकारे दहावीला माझ्या वर्गात आले. अविनाश अत्यंत शांत, बुजरा असा होता. त्याचे विशेष म्हणजे युनिफॉर्मला सुटी असेल अशा दिवशी तो अतिशय पांढराशुभ्र शर्ट घालून येई. इतका शुभ्र स्वच्छ रंग मी कधीच पाहिला नव्हता. अविनाशचे हस्ताक्षरही अतिशय सुंदर, वळणदार होते. त्याची आणि माझी मैत्री व्हायला फार वेळ लागला नाही. अविनाशची मोठी बहीण उषा माझ्या आईची कॉलेजमध्ये विद्यार्थिनी – तीही आईची लाडकी – असल्याचे नंतर मला कळले.

अभयची माझी यापूर्वी ओळख नसली तरी त्याचे वडिल डॉ. धनवडे आमचे फॅमिली डॉक्टर असल्याने चांगलेच परिचयाचे होते. कोडोलीच्या मिशन हॉस्पिटलमध्ये ते काम करत. आमच्या घरी कोणाची तब्येत बिघडली तर स्कूटरवर बसून तपासणी करायला ते चक्क आमच्या घरी येत. त्या काळातसुद्धा घरी येऊन तपासणारे डॉक्टर विरळाच होते.

अभय उंचापुरा, दणकट अंगकाठीचा होता. स्वभावाने साधा, डॉक्टरचा मुलगा असूनही गर्वाचा अंशही नसलेला असा होता. "हुशार" मुलांशी मैत्री करावी असा चुकीचा सल्ला कुणीतरी दिल्यामुळे असेल, त्याने माझ्याशी संवाद सुरू केला व आमचीही मैत्री लवकरच झाली. बऱ्याचदा अविनाश, अभय आणि मी असे तिघे कुठे-कुठे भटकल्याचे आठवते. अभयचा आवाज गोड होता आणि किशोरकुमारची वगैरे गाणी तो छान म्हणायचा.

महाराष्ट्र राज्यातील शिक्षक संघटनेने संप पुकारल्यामुळे आमचे दहावीतले वास्तव्य तब्बल तीन महिन्यांनी वाढले. अर्थात आम्हापैकी कोणालाच लगेच कॉलेजला जाऊन करीयर बिल्ड करण्याची घाई नसल्याने आम्हाला काहीच फरक पडला नाही. तीन महिने बोनस मिळावा अशा प्रकारे आम्ही ते दिवस मजेत घालवले. शाळेत असेपर्यंत शाळेविषयी अपार प्रेम होतेच! मला आठवते त्याकाळी घरची सायकल माझ्या हाती आली असल्याने तिच्यावर बसून मी गावभर हिंडायचो. रात्री-अपरात्री, कधी पहाटे ६-७ वाजता सुद्धा. अनिलच्या किंवा प्रमोदच्या घरी अभ्यास करायला मुलांचा अड्डा पडलेला असायचा. तिथे जाऊन गप्पा मारायचो. दहावीची होती नव्हती ती सर्व पुस्तके, अपेक्षित प्रश्नसंच, नमुना परीक्षा इत्यादी सर्व आमची वाचून झाली. आमचे शिक्षकही आमचा अभ्यास घेऊन घेऊन कंटाळले. शेवटी मे-जूनमध्ये बोर्डाची अंतिम परीक्षा होऊन आमची खरी उन्हाळ्याची सुटी सुरू झाली. प्रत्यक्ष निकाल यायला ऑगस्ट उजाडला!

या दहावीच्या सुटीदरम्यान मला अजून एक नवीन मित्र मिळाला. अभय धनवडेशी मैत्री झाल्याने माझे त्यांच्या घरी जाणे-येणे सुरू झाले होते. तिथेच अचानक एके दिवशी माझी अतुलशी – अभयच्या मोठ्या भावाशी – ओळख झाली. अतुल हा जवळपास अभयच्याच वयाचा होता आणि आमच्याच इयत्तेत होता. इतकी वर्षे तो बेळगाव इथे कॉन्व्हेंट शाळेत शिकायला होता आणि ते शिक्षण संपवून कॉलेजसाठी तो घरी – म्हणजे कोडोलीला – परत आला होता. याचा अर्थ अकरावीत तो आमच्याच बरोबर श्री वारणा महाविद्यालयात असणार होता!

राजबिंडा, गोरटेला, इंग्लिश-मिडियम शाळेत शिकलेला पण मराठी व्यवस्थित बोलणारा असा माझ्याच वयाचा हा अतुल माझ्यासाठी एक कल्चर शॉकच होता. अतुलची एक स्टायलिश सायकल होती. त्याचे कपडे, वागणे-बोलणे सगळेच स्टायलिश होते. Sophisticated हा शब्दही ज्यावेळी मला माहित नव्हता त्यावेळी त्याचे मूर्तिमंत उदाहरण अतुलच्या रूपाने मी पाहात होतो. डॉ. धनवडेंचे घर इंग्लिश कॉटेजच्या धर्तीचे होते. अतुलच्या आगमनानंतर जेव्हा मी चालत त्यांच्या घरी जाई तेव्हा दार उघडल्यावर लगेचच आत खोल कुठूनतरी इंग्लिश संगीत ऐकू येई, जे मी पूर्वी कधीच ऐकले नव्हते. Abba आणि Boney M यांच्या गाण्यांची ओळख अतुलमुळे झाली! त्या ठेकेदार आणि मंजुळ संगीताच्या मी प्रेमात पडलो ते कायमचाच. गाण्यांचे शब्द काय आहेत याचा मात्र पत्ता लागायचा नाही. काही तर मराठीच आहेत की काय अशी शंका यायची. Boney M चे "ये ये बोलत नाही" हे त्यातलेच एक!

डॉक्टरचा मुलगा, देखणा, आणि इंग्लिश-मिडियम मध्ये शिकलेला वगैरे असल्यावर अतुलने जरा दादागिरी केली असती, उर्मटपणे वागला असता, “मी कोणीतरी भारी आहे” असा आव आणला असता, गावठी म्हणून मला हिणवले असते, तर ते सर्व मी सहन केले असते. कारण ते सर्व

खरेच होते. त्याच्यासमोर मी गावठी होतोच. सर्वच बाबतीत तो एखाद्या advanced civilization चा वाटावा असा होता!

पण दादागिरी, उर्मटपणा, गर्व अशा सर्व दुर्गुणांचा लवलेशही अतुलमध्ये नव्हता. याचे श्रेय मी डॉक्टरसाहेब आणि अतुलच्या आईला देईन. ते दोघेही स्वभावाने अतिशय नम्र आणि सुस्वभावी होतेच. अतुल आणि सुबोध (धनवडेंचा सर्वात मोठा मुलगा) या दोघांना शालेय शिक्षणासाठी त्यांनी बेळगावच्या कॉन्व्हेंट शाळेत ठेवले असले तरी तिथल्या वातावरणामुळे मुलांवर चुकीचे संस्कार होणार नाहीत याची दक्षता आईवडिलांनी घेतल्याचे स्पष्ट दिसत होते. अतुल निव्वळ दिसण्यात व वागण्या-बोलण्यात polished नव्हता. त्याचे विचार, छंद, अभिरूची हे सर्व एका वेगळ्याच पातळीवरचे, वेगळ्याच जगातले होते. मला बरेच काही शिकवून जातील असे होते. अतुलच्या सहवासात माझा गावठीपणा गेला असे म्हणणे धाडसाचे होईल, पण कमीतकमी त्याची जाणीव मला झाली आणि एका वेगळ्या प्रकारच्या, westernized म्हणता येईल अशा जीवनशैलीचे, विचारपद्धतीचे आकर्षण माझ्यात नक्कीच निर्माण झाले. अतुलमुळे अगाथा ख्रिस्तीसारख्या दर्जेदार लेखिकेशी माझा परिचय झाला. तसेच सिडने शेल्डन आणि हॅरोल्ड रॉबिन्स अशा – teenage जनतेसाठीच जणू लिहिणाऱ्या – लेखकांचीही ओळख झाली. बाबुराव अर्नाळकरांसारखे लिहिणारे इंग्लिशमध्ये पण आहेत हे पाहून हायसे वाटले!

त्या सुटीत आम्ही अकरावीचा जुजबी अभ्यासही सुरू केला. कारण माझ्यासाठी शाळेतले मराठी मिडियम ते अकरावीचे पूर्ण इंग्लिश मिडियम हा मोठा बदल होता. आम्ही गणिताची वगैरे पुस्तके चाळताना माझे इंग्लिश अतुलच्या तुलनेत किती खालच्या दर्जाचे आहे हे सारखे जाणवत राही. Ratio of x and y हे वाचताना मी रेटिओ असे वाचल्यावर अतुल खो-खो हसल्याचे आठवते. पण असे काही झाले की लगेचच तो मला दुरूस्त करून सांभाळून घेई. सुदैवाने केवळ मित्रासमोर गावठीपणा केला

म्हणून धाडकन कोलमडावा इतका माझा आत्मविश्वास नाजुक नसल्याने मी अतुलसमोर टिकून राहिलो, नव्हे त्याच्या मदतीने मी माझ्या गावठी कंगोऱ्यांना जमेल तितके शहरी वळण द्यायचा प्रयत्न करीत राहिलो.

आमची प्रत्यक्ष अकरावी सुरू झाली तोपर्यंत माझी आणि अतुलची छान मैत्री झाली होती. आता आम्ही जोडीनेच कॉलेजला जाऊ लागलो. एकाच बाकावरही बसू लागलो. अतुल त्याची स्टायलिश सायकल घेऊन येई. व्यायामशाळेत कमावलेले शरीर आणि स्टायलिश कपडे यामुळे अतुल एकदम handsome दिसे.

वर म्हटल्याप्रमाणे कॉलेजला गेल्यावर आम्हा वारणेच्या पोरांची स्थिती गोठ्यातून सुटलेल्या वळूंसारखीच होती. दंगा, धुडगूस, बेशिस्तपणा, क्लास बुडवणे, प्रोफेसरांच्या टिंगलटवाळ्या – जे जे काही प्राचार्यांच्या मनावर आघात करून गेले असते ते सर्व आम्ही बिनदिक्कत सुरू केले. अकरावीत मला हसण्याचा रोग जडला. तेही टवाळखोर हसणे. प्रोफेसरांच्या चमत्कारिक लकबी, चुका, काहीही हसायला मला पुरे असायचे. आमचे इंग्लिशचे चव्हाणसर स्टाईल मारून बोलायचे. त्यांच्या प्रत्येक वाक्याला मला अनावर हसू लोटायचे. अतुल बिचारा सज्जन, शिस्त पाळणारा असा होता व तसे राहाण्याचा प्रयत्नही करी. मी मात्र सुटलो होतो! अतुलच्या संगतीमुळेच बहुधा मी अकरावीत पूर्ण वाया गेलो नाही!

एक गंमतीशीर आठवण सांगतो – पुन्हा एकदा माझ्या गावठी इंग्लिशची. आम्हाला अकरावीत इंग्लिशलाच २-३ प्रोफेसर होते. त्यातले एक कुलकर्णी नावाचे वारणेत नवीनच आले होते. विद्यार्थ्यांची नावे विचारताना माझे नाव समजल्यावर त्यांनी विचारले, “Are you related to Prof. BG Joshi?” हे प्रोफेसर बीजी जोशी म्हणजे माझे वडिल – ते इंग्लिश विभागाचे प्रमुख होते. तर मी लगेच उत्तर दिले, “Yes, I am son of

him!” अर्थात माझे हे भयानक इंग्लिश ऐकल्यावर अतुलला खो-खो हसण्यावाचून पर्याय नव्हता!

आमचे अकरावीत आगमन होण्याआधीच आमची बॅच म्हणजे “हुशार मुलांची” अशी कॉलेजमध्ये इमेज होती. पण आमचे बेशिस्त वर्तन, अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष हे सर्व पाहून प्रोफेसर लोक आधी बुचकळ्यात आणि नंतर काळजीत पडले. दहावीत distinction वगैरे मिळवून उत्तीर्ण झालेली, काहीजण तर बोर्डात विशेष गुणवत्ता मिळवलेली ही पोरे आपल्या राज्यात फेल झाली तर आपलीच नामुष्की व्हायची अशी त्यांना काळजी वाटू लागली. आमची अकरावी कशीबशी पार पडली. पण बारावीतही हेच चित्र चालू राहिले. आमचे अभ्यासाकडे काहीच लक्ष नाही. दंगा-धुडगूस चालूच. मला आठवते, अखेरचा प्रयत्न म्हणून बारावीत ४-५ महिने उलटल्यावर जयतीर्थ, दामले, पी. आर. कुलकर्णी आदी प्रोफेसरांनी आम्हा सर्वांना भेटायला बोलावले व आमच्या बेताल वागण्यावर व अभ्यासातल्या दिरंगाईबद्दल आधी आश्चर्य व्यक्त केले आणि मग आम्हाला कडक शब्दांत सुनवले. That was the turning point. त्या दिवशी अतुलही मला म्हणाला, we have taken this too far. आपले चुकतेय. वगैरे. मग त्या दिवसापासून आम्ही थोडेफार ताळ्यावर आलो असे म्हणता येईल. अतुल आणि मी जोरात अभ्यास सुरू केला. अविनाश आणि नागनाथ डोईजड आमच्या ग्रूपमध्ये होते. आता आम्ही सर्व अचानक अभ्यासिकेत दिसू लागलो. वीज गेली तरी कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास करताना आम्हाला एक-दोघांनी पाहिले व ती good news आमच्या घरी गेली. सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला!

अतुलची इच्छा मेडिकल किंवा डेन्टल कॉलेजमध्ये जायची होती. त्याप्रमाणे त्याने जीवशास्त्र व इतर विषयांच्या अभ्यासावर जोर दिला. माझे पुढे काय करायचे नक्की होत नसल्याने मला सर्वच विषयांचा अभ्यास करणे भाग होते. आमच्या बरोबर बाहेरगावांतून आलेले शिवाजी पडवळ, मधुकर

कुलकर्णी आदि विद्यार्थी अकरावीपासूनच पूर्ण एकाग्रतेने अभ्यासात मग्न होते. त्यांची अफाट प्रगती पाहून आणि त्यांचे परीक्षांतले मार्क्स पाहून आम्हाला वैषम्य वाटे. पण करणार काय, जागे व्हायला उशीर झाला होता. शेवटचे ५-६ महिने अभ्यास करून आम्ही बारावीच्या दिव्यातून पार पडलो. अतुलला मुंबईच्या डेन्टल कॉलेजमध्ये admission मिळाली, आणि मला सांगलीच्या वालचंद कॉलेजमध्ये. कसा कोण जाणे, माझा पुन्हा एकदा बोर्डात नंबरही आला! आम्ही आणि सर्व प्रोफेसर मंडळींनीही सुटकेचा निःश्वास टाकला.

अतुलची माझी मैत्री पत्रांद्वारे चालू राहिली. डेंटिस्ट झाल्यावर अतुलने त्याच्या डेन्टिस्ट पत्नीसमवेत कोल्हापुरात त्याचे क्लिनिक सुरू केले. नंतर सौदी अरेबियात काही वर्षे काम करून तो अमेरिकेत स्थायिक झाला. मध्ये आमचा संपर्क खूप वर्षे तुटला होता. पण एके दिवशी विकासच्या Ph.D. पदवीदान समारंभासाठी अचानक मला Delaware च्या जवळ – जिथे अतुल राहातो तिथे – जाण्याचा योग आला. अतुलच्या घराच्या अगदी जवळ आल्यावर मी त्याला surprise call केला आणि विकास, तनुजा व इतर काही मित्रांना घेऊन त्याच्या घरी गेलो. अतुल व प्रभा यांनी आमचे अगत्याने व प्रेमाने स्वागत केले. खूप गप्पा झाल्या. अतुलचे शारीरिक व मानसिक sophistication नुसतेच टिकून आहे असे नव्हे तर ते अजून वेगळ्या, वरच्या पातळीवर गेले आहे हे दिसले आणि मला अतिशय आनंद झाला.

*लेखक: अभय बिंदुमाधव जोशी (abjoshi@yahoo.com)*


At Atul's home in Delaware (2016)